RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# सन्मित्र मंडळ विद्या मंदिरात सायबर जागरूकता उपक्रम

◆ **गोरेगाव (प्रतिनिधी) :**



डिजिटल सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सायबर सुरक्षा कौशल्यांनी सक्षम करण्याच्या उद्देशाने सन्मित्र मंडळ विद्यामंदिर, क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जुलै रोजी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रमुख अभियानांतर्गत आयोजित करण्यात आला. यावर्षीची 'माझा डेटा, माझी जबाबदारी' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांना वैयक्तिक माहितीचे संरक्षण, डिजिटल गोपनीयता आणि सुरक्षित ऑनलाइन वर्तन यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. हे सत्र पाटकर-वर्दे महाविद्यालयातील प्रशिक्षित सायबर वॉरियर्स स्नेहा निळे आणि वैष्णवी सुकळवाडकर यांनी प्रभावीपणे सादर केले. सत्रादरम्यान विद्यार्थी व शिक्षकांना, डेटा संरक्षण आणि गोपनीयता, ऑनलाइन फसवणूक ओळखणे व त्यापासून बचाव, सोशल मीडियाचा सुरक्षित व जबाबदारीने वापर, सायबर गुन्ह्यांची तक्रार कशी व कुठे करावी या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सन्मित्र मंडळ विद्या मंदिर प्रतिनिधींनी या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांसाठी सायबर साक्षरता आणि सुरक्षित इंटरनेट वापराचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स यांचे त्यांच्या संस्थेत हा महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आभार मानले.

Mumbai Edition
Jul, 30 2026 Page No, 8
https://epaper.prahaar.in